ISSN NO. 2231-4059 (PRINT)


UGC Care Group –1 Journal

# भाषा आणि जीवन

(विशेषांक)

वर्ष– ३९ संख्या. –०४

ऑक्टोबर – डिसेंबर २०२१



Scanned with CamScanner

# भाषा आणि जीवन

वर्ष – ३९ संख्या – ०४
ऑक्टोबर – डिसेंबर २०२१

**ISSN NO. 2231- 4059 (PRINT)**

**(UGC Care Group-1)**

मराठी अभ्यास परिषद
आनंदनगर, पुणे ४११०५१

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका



| क्र. | अनुक्रमणिका | | |
|---|---|---|---|
| 1. | ऐतिहासिक स्त्रोतांचा शोध : एक मूल्यमापन | डॉ. कैलास फुलमाळी | 01 |
| 2. | माहीती आणि ज्ञान | चंद्रकांत प्रल्हाद सोनवने | 05 |
| 3. | भारतीय न्यायप्रणालीत लोक अदालतींचे महत्व | चंद्रमणी काशीनाथ भोवते<br>डॉ. अनिल सि. बनकर | 10 |
| 4. | अपार्थिवाचे चांदणे : आस्वादक समीक्षेचे मार्गदर्शक डॉ. द. भि. कुलकर्णी | प्रा. छत्रपाल श्रीपतराव लांबकाने | 18 |
| 5. | ज्ञान प्राप्तीचे एक साधन म्हणून न्याय दर्शनातील प्रत्यक्ष प्रमाण : एक संक्षिप्त विवेचन | डॉ. अतुल महाजन | 23 |
| 6. | बौद्धांचे तत्वज्ञान | प्रा. डॉ.भुसारे एस. आर. | 28 |
| 7. | मानव्यविद्याशाखा अंतर्गत ज्ञान प्राप्तीचे स्त्रोत-एक अध्ययन | डॉ. दिपक जी. अराजपुरे | 32 |
| 8. | ऐतिहासिक संशोधनात कागदपत्रांची निवड (साधन सामुग्रीची निवड) | प्रा.डॉ.महेंद्र वि.गायकवाड<br>डॉ.मधूकरराव वासनिक | 36 |
| 9. | भारतीय तत्वज्ञातातील वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन : ऐंद्रिय अनुभव की गूढ अंत–दृष्टी ? | डॉ. मनोज उत्तमराव पाटील | 42 |
| 10. | भारतीय ज्ञानमिमांसेच्या अनुशंगाने ज्ञानाचे स्त्रोत या शब्दाचे विश्लेषण | डॉ. मोनालिसा अ. खानोरकर | 46 |
| 11. | बोधातून प्राप्त ज्ञान : एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. संतोश पंढरीनाथ मेंढेकर | 51 |
| 12. | न्याय दर्शनातील यथार्थ ज्ञान साधनांचे स्वरुप आणि महत्व | प्रा. डॉ. सीमा देशपांडे | 56 |
| 13. | मध्यकालीन महाराष्ट्रीय संतांच्या कार्याचा मागोवा | डॉ. श्रीकांत डी. पानघाटे | 60 |
| 14. | आंबेडकरवादी इतिहास लेखन प्रवाह: अर्थ, व्याप्ती, तत्वज्ञान आणि स्त्रोत साधने | डॉ. सूर्यकांत महादेवराव कापशीकर | 67 |
| 15. | ज्ञान : संकल्पना आणि ज्ञानाचे विविध स्त्रोत | डॉ. बाळासाहेब मुळीक | 75 |
| 16. | कोरोना काळातील आरोग्य विषयक जागरूकता - एक चिकीत्सा | डॉ. किर्ती आ. वर्मा | 80 |



Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 17. | समाजशरत्रातील ज्ञानार्जनाचे स्त्रोत : एक चिकीत्सा | डॉ. ओमप्रकाश आष्टनकर | 85 |
| 18. | विदर्भ राज्याची मागणी व जनतेची भूमिका | डॉ. रायन ज्यं. महाजन<br>डॉ. संदीप तुंडूरवार<br>डॉ. शरद सांबारे | 89 |
| 19. | भारतीय तत्त्वज्ञानातील ज्ञानाचे स्त्रोत | प्रा.डॉ.शेंडगे विजय सोपानराव | 94 |
| 20. | न्यायदर्शनातील अनुमान प्रमाण-स्वरुप व प्रकार | प्रा.सौ.जयश्री तांबे | 100 |
| 21. | ज्ञानाच्या स्त्रोतात जैन दर्शनातील अनुमान प्रमाणाचे महतवपूर्ण योगदान | प्रा. वर्षा जपे | 103 |
| 22. | वैयक्तिक आणि सामाजिक स्तरावरील पर्यावरणविषयक उपक्रमाचा अभ्यास | डॉ.महादेव विष्णू मत<br>श्रीमती शिवकन्या निवृत्तीराव कदेरकर | 108 |
| 23. | समाजसुधारक संतश्री गाडगे महाराज | प्रा. योगेश मारोती करवाडे | 112 |
| 24. | संगीत उपासनेचा मानवी जीवनावर होणारा सकारत्मक परिणाम | प्रा. वैखरी वझलवार | 118 |
| 25. | 'भारतीय दर्शनातील शब्द प्रमाण' | डॉ. नरेंद्र वसंतराव रघटाटे | 121 |
| 26. | ज्ञानशास्त्र.. एक आव्हान | प्रा.रजनी आनंदराव काळे | 128 |


Scanned with CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

# विदर्भ राज्याची मागणी व जनतेची भूमिका

डॉ. रायन त्र्यं. महाजन

डॉ. संदीप तुंडूरवार

डॉ. शरद सांबारे

राज्यशास्त्र विभाग, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपुर

राज्यशास्त्र विभाग प्रमुख, श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज, स्नेहनगर, नागपूर.

विदर्भाचा प्रश्न ब्रिटिश राजवटीतील एक कळीचा मुद्दा म्हणूनच राहिलेला होता. प्रश्नांच्या राजकारणांना दक्षिणेतून मिळालेली हवा अलिकडच्या काळांमध्ये अधिक चिंताक्रांत करणारी राहिलेली आहे. विदर्भाच्या प्रश्नांचे सर्वच पातळ्यांवर राजकारण झालेले स्पष्टतः दिसून येते. सुहास पळशीकरांनी समकालीन भारतीय राजकारणाच्या विश्लेषणाबाबत प्रतिपादीत केलेल्या मतांमध्ये तत्कालीन सत्तात्म व्यवस्थेला जबाबदारही ठरविले आहे. ते म्हणतात, ''भारतीय राजकारण म्हणजे राज्यांच्या राजकारणांचे गोळा बेरीज आहे किंबहुना भारतीय राजकारण अशी काही गोष्टच नाही जे आहे ते मात्र विविध राज्याचे राजकारण असेच चित्र उभारून असल्यामुळे घटकराज्य हा भारताचा केंद्रबिंदू बनला. या घडामोडीमागे जवळपास 1967 पासून चाललेली एक प्रक्रिया होती. ती म्हणजे कॉंग्रेस व्यवस्थेचा ऱ्हास होय.[1] भारतीय राजकारणाचा पट पळशीकरांच्या चिंतनातून जो व्यक्त झाला आहे ते विश्लेषण विदर्भाच्या प्रश्नाला लागू पडणारे आहेत. वस्तुतः राजकारणाची संकल्पना एक सातत्यपूर्ण गतिविधी मानली जाते. ''काळानुकूल उपस्थित होणाऱ्या आणि राजकीय चिंतकांच्या सामाजिक विचारवंताच्याच स्फूर्तीतून प्रसविलेल्या उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यासाठी जागृत आणि संघटीत झालेल्या लोकशक्तीच्या कार्यकर्तृत्वाचा तो एक मिश्र आविष्कार असतो. उद्दिष्टे जरी समान असली तरी त्यांची पूर्तता करण्यासाठी वेगवेगळी साधने पसरविली, सूचविली अणि अवलंबिली जातात.''[2] एका बाजुला भारतीय राजकारणाची संकल्पना समस्यांच्या परिमर्जनासाठी असते अशी सैद्धांतिक भूमिका या दोन पातळ्यांवर विदर्भाच्या प्रश्नांचे राजकारण समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

प्रांत अथवा राज्य निर्मितीच्या मुळाशी जी विविध घटके कार्य करतात त्यामध्ये अस्मितांना चेतवणाऱ्या गोष्टी किंवा बाबी उग्ररूपाने व्यक्त झालेल्या दिसतात आणि सगळ्याच अस्मिता राष्ट्रवादाच्या निष्कर्षांवर जो खण्याचा प्रयत्न होत असतो. भारतातील प्रादेशिक राजकारणांचा 1980 नंतर बदललेला चेहरा आत्यंतिक गुंतागुंतीचा बनत चालल्याचे निरीक्षण विश्लेषकांना नोंदविले आहे. या निरीक्षणात वाढत्या अस्मिता, राष्ट्रवाद, संघराज्यव्यवस्था, विकासाचा असमतोल आणि राजकीय केंद्रीकरण या चार मुद्यांभेवती फिरतांना दिसत असल्याचे मत मांडले आहेत. 21 व्या शतकाच्या प्रारंभातील एक निरीक्षण नोंदविणे महत्त्वाचे ते म्हणजे यामध्ये अस्तित्वात आलेला पाचवा मुद्दा राजकीय पक्षांची प्रवृत्ती स्पष्ट करणारा आहेत. छोटी राज्य दीर्घकाळ सत्ता टिकवून ठेवण्याकरिता सोईची ठरतात हा प्रयोग ईशान्य भारतातील राज्य आणि झारखंड, छत्तीसगड आणि उत्तराखंड यामधून सिद्ध झाला आहे. विदर्भाच्या प्रश्नाचे राजकारण पहिल्या चार घटकांपेक्षा पाचव्या घटकांशी अतिशय जवळीकता साधणारे आहे. विदर्भ प्रश्नांची गतिमानता टप्यानुसार बदलत गेली. सुरूवातीला विदर्भ अस्मितानंतर विकासाचा असमतोल, नंतर संघराज्याला छोटी राज्ये अनुकूल असतात, तर अलिकडे एकमुखी वर्चस्वाची परंपरा दीर्घकाळ ताब्यात राहू शकते या उद्देशाने प्रश्नाचे केले जात असणारे राजकीय भांडवल लक्षात घेतले तर राष्ट्रीय पक्षांना छोट्याा राज्यांवर वर्चस्व गाजविणे वा आपली सत्ता दीर्घकाळासाठी मजबूत करता येणे यातून राजकारणाची प्रक्रिया घडत असल्याचे स्पष्ट होते.



Scanned with CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोध निबंधसाठी संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. कोणतेही संशोधन शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्याकरिता संशोधन पद्धती अत्यंत महत्त्वाचे आहे. सामाजिक संशोधनामध्ये सामाजिक, राजकीय समस्या सोडविण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. सामाजिक समस्या सोडविण्याकरिता कोणत्याही गृहितकांची पडताळणी करणे, नवीन घटनांचा शोध घेणे, विशिष्ट घटनांमधील नवीन संबंध शोधण्याच्या उद्देशाने कोणत्या तरी योग्य पद्धतीचा उपयोग करणे हा सामाजिक संशोधनाचा अर्थ होय. यावरून हे स्पष्ट होते की सामाजिक संशोधन वैज्ञानिक नियमानुसार अशा मानवी नियमांकडे संकेत करते की त्याद्वारे सामाजिक जीवनाच्या संबंधात आपल्या ज्ञानाची वृद्धी होणे शक्य होते. या पद्धतीमध्ये संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके आणि नमुना निवड पद्धती खालीलप्रमाणे आहेत.

### संशोधनाची उद्दिश्टे

सदर शोध निबंधाकरिता संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आखण्यात आलेली आहे.

1. विदर्भ राज्य मागणीसंदर्भात जनतेकडून होणाऱ्या चर्चांचा अभ्यास करणे..
2. वेगळे विदर्भ राज्या निर्मितीच्या संदर्भात जनतेची भूमिकांचा अभ्यास करणे.

### संशोधनाची गृहितके

कोणत्याही संशोधनाकरिता गृहीतके नेहमी दिशा देणारे ठरतात प्रस्तुत संशोधनासाठी काही गृहितके ठरविण्यात आलेली आहे.

1. विदर्भ राज्याच्या मागणी आणि जनतेची भूमिका विदर्भाचे राज्य निर्मितीस अनुकूल आहे.

### नमुना निवड पद्धती

प्रस्तुत संशोधन निबंधासाठी समग्रातील एककातून नमुन्याची निवड साध्या यादृच्छिक नमुना निवड पद्धतीच्या माध्यमातून करण्यात आलेली आहे. विदर्भाच्या 11 जिल्ह्यातून 550 म्हणजे प्रत्येक जिल्ह्यातून 50 ,वढा नमुना निवडण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधासाठी उत्तरदात्याकडून अनुसूची भरून घेण्यात आली आहे त्या आधारावर मांडणी करण्यात आली आहे.



Scanned with CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

**अध्यायन क्षेत्र**

संशोधनासाठी निवडण्यात आलेले क्षेत्र विदर्भ प्रदेश आहे. यात 11 जिल्ह्याचा समावेश आहे ते म्हणजे नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अमरावती, अकोला, यवतमाळ, आणि बुलढाणा या जिल्ह्यांचा समावेश आहे.

## सारणी क्र.1

**विदर्भाच्या चर्चेबाबत उहापोह दर्शविणारी, भूमिका स्पश्ट करणारी सारणी**

| क्र. | स्वतंत्र विदर्भाच्या चर्चेबाबत अलीकडे अधिक उहापोह होतो काय? | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | होय | 414 | 75.27 |
| | नाही | 89 | 16.18 |
| | सांगता येत नाही | 47 | 8.54 |
| | एकूण | 550 | 100: |

## सारणी क्र. 2

**स्वतंत्र विदर्भाबाबत भुमिका दर्शविणारी सारणी**

| क्र. | स्वतंत्र विदर्भाबाबत तुमच्या भूमिका | उत्तरदात्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| | स्वतंत्र राज्य पाहिजे | 329 | 59.82 |
| | संयुक्त महाराष्ट्रातच राहिले पाहिजे | 55 | 10.00 |
| | विदर्भाचा अनुशेष दूर झाला पाहिजे | 54 | 9.81 |
| | भेदभाव न करता सारखा विकास करणे | 112 | 20.37 |
| | एकूण | 550 | 100: |



Scanned with CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

पूर्वीच्या तुलनेत मागील पाच वर्षामध्ये विदर्भ राज्य निर्मितीचे वातावरण अधिक निर्माण झालेले आहे. सर्वसामान्यांना ढवळून काढण्याची क्षमता या वातावरण निर्मितीत दिसून येते. सदर सारणीवर दृष्टिक्षेप टाकल्यास विदर्भ प्रश्नाची चर्चा सर्वच पातळ्यांवर मोठ्याा प्रमाणात असल्याचे प्रतिपादन 414 उत्तरदात्यांनी नोंदविले आहेत. चर्चेच्या सुराबाबत संदिग्धता असणाऱ्यांचे प्रमाण 8.54 प्रतिशत आहे. तर 89 उत्तरदात्यांनी चर्चेच्या उहापोहाला खारीज केले आहे.

याच सारणीशी निगडीत असणारी सारणी तपासल्यास स्वतंत्र राज्य निर्मितीत आपला कल स्पष्टतः दर्शविणाऱ्यांची संख्या 59.82 प्रतिशत आहे. विदर्भातील राज्यनिर्मितीला नकार देणारे आणि एकाच भाषिक राज्यांचे ठामपणे प्रतिपादन करणाऱ्यांची संख्या 109 आहे. तर विकासात कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता समपातळीवर बदलाव घडून आणणाऱ्यांची संख्या 20.37 प्रतिशत उत्तरदात्यांनी नोंदविली आहेत. राज्यनिर्मितीचे पर्याय मांडून प्रश्नाची तीव्रता कमकुवत करता येते यावर भर देणाऱ्यांचे प्रमाण मोठे दिसून येते.

मगील पाच वर्षामध्ये सर्वच राजकीय पक्षांनी विदर्भाचा प्रश्न या ना त्या माध्यमातून रेटून धरला आहे. परिणामतः जनतेच्या पातळीवर त्याची चर्चा मोठ्याा प्रमाणात घडून येत आहे. होऊ घातलेल्या स्थानिक संस्थांच्या निवडणुकांमध्ये विदर्भाचे जनमत जोखण्याचा प्रयत्न नवनिर्मित विदर्भवादी पक्षांनी ठेवला आहेत. ग्रामीण भागामध्ये ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामसभा अंतर्गत ठराव मांडणारी, मंजूर करणारी जी गावे आहे त्यांचा कस निवडणूक प्रक्रियेत लागेल. यामुळे विदर्भ प्रश्नांची चर्चा सर्वसामान्य माणूस एकाच विषयाला केंद्रीत ठेवून घेतो किंवा नाही हे स्पष्ट होण्याचे नवे संकेत प्राप्त होईल. मानवी वर्तन साधारणतः अनेक घटीतांच्या प्रक्रियांचा एकत्रित समुच्चय असतो. सामाजिकशास्त्रांच्या संशोधनामध्ये ही मर्यादा आहे की एखादा प्रयोग सिद्ध करणाऱ्या साधनांच्या माध्यमातून सिद्ध करणे अवघड असते. याचे कारण संपूर्ण विश्व हे सामाजिक शास्त्राची प्रयोगशाळा आहे. त्याच्यातील व्यक्ती विशिष्ट स्वरूपातील घनवस्तू नसल्याने त्यांचे वर्तन परिस्थितीनुरूप बदलू लागते. विदर्भाच्या प्रश्नावर निवडणूक लढविणाऱ्या राजकीय पक्षांना उचलून धरले तर चर्चेचे गांभीर्य निर्माण झालेले आहे हे स्पष्ट करणारी या पूर्वीची सारणी स्वयंः सिद्ध ठरेल. तुर्तास चर्चा व्यापक बनलेली आहे. याचे प्रतिपादन 75.27 प्रतिशत उत्तरदात्यांना वाटणे हे समकालीन चर्चात्मक विषयाला प्रभावीरित्या सादर करणारे आहे.

राज्य निर्मितीबाबत आपली मते स्पष्टपणे दर्शविणाऱ्यांचे प्रमाण दखलपात्र आहे. भारतीय संघराज्याचा बदलत असलेला तोंडवळा लोकांसमोर छोटी राज्य विकासाला पूरक, कामकाजातील सुलभता, आदान–प्रदान–प्रत्यादान यामधील गुंतवणूक कमी करणारे कालापव्यय टाळणारे पैसा बचत करणारे, कायदा आणि सूव्यवस्था नियंत्रणात ठेवण्याकरिता फारसे न लागणारे कष्ट महत्त्वाचे म्हणजे आवाक्यात असणारा भूगोल यामुळे स्वतंत्र राज्य निर्मितीला अनुकूलता लाभत असल्याचे स्पष्ट होते. स्वतंत्र राज्यनिर्मितीबाबत सर्वात कळीचा मुद्दा रोजगार क्षमतांची निर्मिती हा ठरला आहे. प्रशासन, राजकारण, सेवाक्षेत्र, उद्योग, व्यापार, व्यवसाय या सगळ्याा ठिकाणी संधीच्या सूनिश्चितता तरूण वर्गांना अधिक आकर्षित करणारे आहेत. वयोगटाच्या आधारावर वर्गीकरण केल्यास स्वतंत्र राज्यनिर्मितीच्या बाबतीत आपली अनुकूलता दर्शविणाऱ्याचे प्रमाण 18 ते 35 या वयोगटात अधिक आहे. त्याचे कारण या वर्गाला रोजगार विन्मुखतेचे चटके सहन करावे लागत आहे. हे प्रमाण जीवन जगणे आणि भावनिकता यांच्याशी निगडीत आहे. विदर्भात जे स्पष्टपणे तीन प्रवाह आढळतात त्या प्रवाहाचे प्रगटीकरण सदर सारणीत दिसून येते. अनुशेषाच्या भरपाईबाबत दर्शविणारे जनमत हे भौगोलिक संदर्भात पृथक केल्यास वऱ्हाड प्रांतातील आहे. अनुशेषकर्त्यांनी जिल्ह्याच्या अनुशेषाच्या ऐवजी दरमाशी



Scanned with CamScanner

ISSN NO : 2231-4059
(UGC Care Group - 01)

अनुशेष लक्षात घ्यावा अशी मागाणी राज्यापालांकडे करून वऱ्हाड प्रांतातील अनुशेष भरून काढण्याकरिता निधीची मागणी मांडलेली आहे. स्वतंत्र राज्य हवे आहे असे म्हणणाऱ्या उत्तरदात्यांचे मत मात्र एकदाकी राज्य अस्तित्वात आले तर अनुशेष आपोआपच भरून निघेल. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत विदर्भातील ज्या लोकांनी चळवळ राबविली त्या मध्यप्रांतातून महाराष्ट्राचा भाग होऊ इच्छिणाऱ्यांची जी भावना होती त्या भावनेला प्रतिबिंबीत करण्याचे काम अल्पप्रमाणात का होईना असे 10 प्रतिशत उत्तरदात्यांना वाटते. संघात्मक प्रणाली कायम राखतांना तिचे पृथक्करण होणे हा एक तर्क दिल्या जाते. तरी या प्रश्नाच्या मुळाशी भाषेची एकात्मता पर्यायाने अस्मितेचा भाग प्रभावी आहे. एकाच भाषिकांचे एक राज्य तयार झालेले असल्यामुळे विकासाची संतुलित भूमिका असावी हे मांडणाऱ्यांचे प्रमाण लक्षात घेण्यासारखे आहे. एक भाषा एक संस्कृती एक अस्मिता असे जर स्वरूप असेल तर राज्यातील जनतेमध्ये भेदभाव होणे हे संयुक्तिक नाही ही बौद्धिक आणि समंज स्वरूपाची भूमिका उत्तरदात्यांचे उद्‌बोधन प्रशिक्षण आणि त्यांच्यातील जाणीवा स्पष्ट करणारे

आहे. 'विकासाचे संतुलित माप' ही भूमिका संघात्मक ढाचा शाबुत राखण्यासोबतच कायदा आणि सूव्यवस्था यांची जोपासना करणारी आहे.

**संदर्भः—**

1. सुहास पळशीकर, समकालीन भारतीय राजकारणाचे विश्लेषण, मराठी वाचनसाहित्य मालिका क्र. 2, को—ओरडीनेटर CAS राज्यशास्त्र विभाग आणि लोकप्रशासन विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, 2009, पृ. 9
2. प्रविण बरदापूरकर (संपा.), समकाल, विजय प्रकाशन, नागपूर, 2009, पृ. 1
3. आगलावे प्रदिप, सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन नागपुर 2008 पृ.



Scanned with CamScanner